**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

## प्रेस नोट

दिनांक 21/08/2021 (शनिवार)
(सायंकाळ)

---

### अवैध गावठी मोहाफुल दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक
### स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिनांक 20/08/2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखा,ना.ग्रा चे पथक पो.स्टे खापा परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, एक इसम अवैधरित्या मोहाफल दारूची वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या खबरेवरून स्थानिक गुन्हे शाखाचे पथकाने मौजा कोथुर्णा शिवार येथे नाकाबंदी केली असता दिनांक 20/08/2021 चे 10.00 वा. दरम्यान एक एमएच–31/सीएन–1028 क्रमांकाची कार येतांना दिसली. तेव्हा सदर कारला थांबवुन तपासले असता कारमध्ये आरोपी नामे– रासीव वसीम शेख, वय 23 वर्ष, रा. मनसर ता. रामटेक याचे ताब्यातुन अवैधरित्या विनापरवाना 200 किला मोहाफुल किंमत 14,000/–रू. चा माल घेउन वाहतुक करतांना मिळुन आला. त्याचे ताब्यातुन 200 किलो मोहाफुल किंमत 14,000/–रू. व 1 अल्टो कार किंमत 1 लाख रू. असा एकुण 1,14,000/–रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पो. स्टे. खापा येथे गुन्हा दाखल आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे सहायक श्री. बाबा केचे, स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 69, 81 महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधिक्षक श्री राहुल माकणीकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनाखाली सफौ बाबा केचे, पोहवा चंद्रशेखर गडेकर, पोहवा निलेश बर्वे, नापोशि राजु रेवतकर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर